# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४१६ ००४.

**परिपत्रक क्र.कोविमं/ए-२/उ.मा./प्रात्य./फेब्रुवारी-मार्च २०१९/२८७७/दिनांक १८ जानेवारी २०१९**

**विषय :- प्रात्यक्षिक व भाषा विषयांच्या तोंडी परीक्षेचे साहित्य वाटपाबाबत तसेच स्विकारण्याबाबत**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रु.-मार्च २०१९ परीक्षेच्या शास्त्र, तंत्र, व्यावसायिक आणि किमान कौशल्यावर आधारीत व्यावसायिक विषयांची **प्रात्यक्षिक परीक्षा तसेच भाषा विषयांची तोंडी परीक्षा शुक्रवार दि. ०१/०२/२०१९ दिनांक ते सोमवार दिनांक १८/०२/२०१९** या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांचे गट (बॅचेस) पाडून प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेचे तयार केलेल्या विषय निहाय वेळापत्रकाची एक प्रत या कार्यालयाकडे पाठवून द्यावी. पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी तोंडी, प्रात्यक्षिक परीक्षा नव्याने देणेची आहे.

सदर प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेचे गोपनीय साहित्य **जिल्हा वितरण केंद्रावर सोमवार दिनांक २८ जानेवारी २०१९ रोजी सकाळी १०.०० ते ४.००** या वेळेत वितरीत केले जाईल. तरी सदर दिवशी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रतिनिधीस अधिकार पत्र देवून निर्धारित वेळेत वितरण केंद्रावर पाठविण्याची व्यवस्था करावी. आपणाकडून वरील दिवशी साहित्य स्विकारले गेले नाही तर ते त्याच वितरण केंद्रांवरुन प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेच्या अगोदर परस्पर घेवून जाण्याची जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी. आपण सदरचे साहित्य वेळेवर स्विकारले गेले नाही व त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय झाल्यास हे मंडळ जबाबदार राहाणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच '' **माहिती तंत्रज्ञान** '' या विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा मंडळाने पुरविलेल्या कायम स्वरुपी प्रश्न योजनेच्या आधारे घेण्यात यावी. सदर विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी संगणकावर तयार केलेल्या प्रात्यक्षिक परीक्षेची प्रत (प्रिंट) काढावी व तीच उत्तरपत्रिका ग्राहय असल्याने त्यावर विद्यार्थ्याचे गुण द्यावेत व उत्तरपत्रिका सिलबंद करुन मंडळाकडे पाठवावी.

सन २०१८-२०१९ मध्ये इ.१२ वी मध्ये शिकणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांसाठी '' **माहिती तंत्रज्ञान**'' विषयाची परीक्षा **ऑनलाईन पध्दतीने दिनांक १६/०३/२०१९ , दि.१८/०३/२०१९ व १९/०३/२०१९ रोजी सकाळी ११.०० ते १.३० व दुपारी ३.०० ते ५.३०** या वेळेत घेण्यात येणार आहेत. सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा कनिष्ठ महाविद्यालयातील संगणकाची मर्यादीत संख्या लक्षात घेता एकाच वेळे घेणे शक्य नसल्यास ती गटागटामध्ये घेण्यात यावी. यासाठी सदरचे तीन दिवस देण्यात आलेले आहेत.यासाठी कनिष्ठ महाविद्यालयानी त्यांच्या संगणक प्रयोगशाळेच्या क्षमतेप्रमाणे विद्यार्थ्यांचे गट करावेत. त्याप्रमाणे त्यानी **परीक्षेचा दिनांक व वेळ संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा कालावधीपूर्वी माहित करुन देणे आवश्यक आहे याची कटाक्षाने नोंद घ्यावी.** तसेच ऑनलाईन परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आपण आपल्या स्तरावर आपल्या कार्यक्षेत्रातील विद्युत मंडळ, दुरध्वनी कार्यालय व इंटरनेट सेवा पुरविणाऱ्या संस्थाना आपली सेवा अखंडीतपणे मिळण्याबाबत लेखी विनंती करण्यात यावी.

प्रात्यक्षिक परीक्षा पूर्ण झाल्यानंतर प्रात्यक्षिक परीक्षेच्या उत्तरपत्रिका, गुणपत्रिका, गैरहजेरी अहवाल, देयके, गोपनीय अहवाल इ. सर्व कागदपत्रे विषयनिहाय सुचना दिल्याप्रमाणे मंडळाने पुरविलेल्या स्वतंत्र पाकीटांमध्ये सिलबंद करुन संबंधित जिल्हा स्वीकृती केंद्रावर **बुधवार दिनांक २०/०२/२०१९** रोजी देण्यात यावे. भाषा व इतर विषयांच्या गुणपत्रिका तसेच ग्रेडलिस्ट स्वतंत्र पाकिटामध्ये सिलबंद करुन पाकिटावर विषयाचा व कनि.महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांकचा स्पष्ट उल्लेख करुन जिल्हा स्विकृती केंद्रावर प्रात्यक्षिक साहित्यासोबतच देण्यात यावे.

फेब्रुवारी-मार्च २०१९ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र प्रात्यक्षिक, भाषा व इतर विषय तोंडी परीक्षेच्या कार्यक्रमाची नोंद प्राचार्यांनी घ्यावी. वितरण केंद्रावर साहित्य नेण्यासाठी व जमा करणेसाठी आपल्या प्रतिनिधींना पाठविण्याची व्यवस्था करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

प्रति, १) प्राचार्य, सर्व कनिष्ठ महाविद्यालये , सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्हे

**२) वितरण केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, प्रात्यक्षिक परीक्षोत्तर साहित्य दि.२०/०२/१९ रोजी स्विकारून सदरचे साहित्य (उत्तरपत्रिका, देयक, गुणतक्ते पाकीटे इ. याप्रमाणे क.महाविद्यालय सांकेतिक क्रमांक निहाय) वर्गीकरण करून तशा याद्या दिनांक २१/०२/१९ पर्यंत तयार करून ठेवाव्यात व हे साहित्य आणणेसाठी मंडळाचे प्रतिनिधी आपणाकडे दि.२२/०२/२०१९ रोजी टेम्पो घेऊन येतील तेव्हा टेम्पोमध्ये भरण्याची व्यवस्था करावी. आपले साहित्य ओळखता यावे यासाठी लेबल तयार करून चिटकवावेत व हे स्विकारलेले साहित्य ताब्यात देणेसाठी गुरुवार दिनांक २३/०२/२०१९ रोजी मंडळ कार्यालयात सकाळी १०.०० वाजता उपस्थित रहावे.**